**अमरावती महानगरपालिका, अमरावती**
**दिनांक ६.२.२०२३ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय**

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक ५५ :-** राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत 3 शहरी आरोग्य केंद्राच्या नावामध्ये बदल करणे बाबत (आधीचे NGO)

**ठराव क्रमांक ५५ :-** NGO अंतर्गत 3 शहरी आरोग्य केंद्रे जे आता संपुर्णत: NUHM UPHC मध्ये परीवर्तीत झालेली आहेत. तरी त्यांचे नावे बदल करावयाचा आहे.

उपरोक्त विषयास अनुसरून अमरावती महानगरपालिका कार्यक्षेत्रात 3 NGO ची शहरी आरोग्य केंद्रे कार्यरत होती.

१.श.आ.केंद्र वनिता समाज
२.श.आ.केंद्र संजीवनी
३.श.आ.केंद्र यंग मुस्लीम सोशल असोसिएशन

तरी उपरोक्त 3 NGO ची श.आ.केंद्र यांचे अनुदान शासनाने बंद केले असून, उपरोक्त श.आ.केंद्रे आता NUHM facility / NUHM UPHC मध्ये परीवर्तीत करण्यात आलेली आहे. तरी खालील मुद्याप्रमाणे उपरोक्त शहरी आरोग्य केंद्राच्या नावात बदल करण्यात येईल.

१.**शहरी आरोग्य केंद्र वनिता समाज** - शहरी आरोग्य केंद्र वनिता समाज हे हमालपुरा अतिक्रमण झोन कार्यालय येथे स्थानांतरीत करण्यात येणार आहे. तरी वनिता समाज श.आ.केंद्राचे नाव **UPHC हमालपुरा** हे करावे लागणार आहे.

२.**शहरी आरोग्य केंद्र संजीवनी** - शहरी आरोग्य केंद्र संजीवनी हे शाम नगर, उर्दु शाळा क्रं. 5 येथे स्थानांतरीत करण्यात येणार आहे. तरी सदर श.आ.केंद्राचे नाव **UPHC शाम नगर**, असे ठेवावे लागणार आहे.

३.**शहरी आरोग्य केंद्र यंग मुस्लिम सोशल असोसिएशन** - सदर शहरी आरोग्य केंद्र हे पठाण चौकात मनपा येथे स्थानांतरीत झाले आहे. तरी सदर श.आ.केंद्राचे नाव **UPHC पठाण चौक** असे ठेवावे लागणार आहे. मा.आयुक्त यांनी दिनांक ३०/११/२०२२ रोजी मंजुरी दिलेली आहे.

तरी उपरोक्त प्रस्ताव शासनास पाठविणे करीता सर्वसाधारण सभेमध्ये मान्यता प्रदान करणे करीता सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा./-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा./-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.